# ॥ दशावतार आरती ॥

आरती सप्रेम जय जय विठ्ठल परब्रह्म ।
भक्तसंकटीं नाना स्वरूपीं स्थापिसी स्वधर्म ॥ धृ॥

अंबऋषीकारणें गर्भवास सोशीसी ।
वेद नेले चोरूनी ब्रह्मा आणुनियां देसी ॥
मत्स्यरूपी नारायण सप्तही सागर धुंडीसी ।
हस्त लागतां शंखासुरा तुझा वर देसी ॥ १॥

रसातळाशीं जातां पृथ्वी पाठीवर घेसी ।
परोपकारासाठीं देवा कांसव झालासी ॥
दाढें धरूनी पृथ्वी नेतां वराहरूप होसी ।
प्रल्हादाकारणें स्तंभीं नरहरि गुरगुरसी ॥ २॥

पांचवे अवतारीं बळिच्या द्वाराला जासी ।
भिक्षे स्थळ मागुनी बळिला पाताळीं नेसी ॥
सर्व समर्पण केलें म्हणउनि प्रसन्न त्या होसी ॥
वामनरूप धरूनी बळिच्याद्वारीं तिष्ठसी ॥ ३॥

सहस्रार्जुन मातला जमदग्नीचा वध केला ।
कष्टीं ते रेणुका म्हणुनी सहस्रार्जुन वधिला ॥
निःक्षत्री पृथ्वी दान दिधली विप्राला ।
सहावा अवतार परशुराम प्रगटला ॥ ४॥

मातला रावण सर्वां उपद्रव केला ।
तेहतीस कोटी देव बंदीं हरलें सीतेला ॥
पितृवचनालागीं रामें वनवास केला ।
मिळोनी वानर सहित राजाराम प्रगटला ॥ ५॥

देवकीवसुदेव बंदीमोचन त्वां केलें ।
नंदाघरीं जाउन निजसुख गोकुळा दिधलें ॥
गोरसचोरी करीतां नवलक्ष गोपाळ मिळविले ।
गोपिकांचें प्रेम देखुनि श्रीकृष्ण भुलले ॥ ६॥

बौद्ध कलंकी कलियुगिं । झाला अधर्म हा अवघा ।
सांडुनि नित्यधर्म सोडुनि नंदाची सेवा ॥
म्लेंच्छमर्दन करिसी म्हणुनि कलंकी केशवा ।
बहिरवि जान्हवि द्यावि निजसुखानंदसेवा ॥ ७॥

---

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated February 16, 1999